Karanjgaon, Taluka Vaijapur
District Chhatrapati Sambhajinagar (FGD)

Date-17.04.2026

1.Introduction

The Climate Resilient Agriculture (CRA) project aims to strengthen climate resilient agriculture across Tamil Nadu, Kerala, Maharashtra, and Bihar by building alliances among farmers, Food Producer Organisations (FPO), research institutions, agri-business firms, consumers and government departments. The key objectives are to identify grassroots agricultural and climate-related challenges through focused group discussions, promote capacity-building programmes for farmers, develop pilot CRA models, and facilitate convergence with existing government schemes and policies.The expected outcome of the project is to create sustainable and climate-resilient farming systems, improve stakeholder coordination, enhance farmers' adaptive capacities, and support long-term agricultural sustainability and livelihood security.

As a part of the project an FGD (Focus Group Discussion) was conducted with 12 farmers from Karanjgaon village in the taluka, held in a field under the shade of a mango tree. Representatives present included Vishwajeet Pujari, Kishor Veer, and Sominath Gholve from ASER, and Abdul from CAG. The discussion covered various topics, including agriculture, water resources, produce markets, climate change, rising input costs, modern farming techniques, innovative agricultural experiments, water availability, and issues concerning farm laborers and the landless.

2.Village Description:

Vaijapur Taluka falls within the backwater zone of the Jayakwadi Project and is also situated in a rain-shadow area, receiving annual rainfall of 550 to 600 mm. While the riverside agricultural land consists of fertile black and alluvial soil—making it suitable for both Kharif and Rabi seasons—at least 60% of the taluka's area is rain-fed (dryland). Consequently, the region lacks adequate infrastructure regarding agriculture, water management, and produce markets.

Although the FGD took place under a mango tree, a nearby sweet lime (Mosambi) orchard had recently been uprooted; the farmers who had removed the orchard also participated in the discussion. Another notable observation was a nearby two-acre groundnut crop; the plants had not received water on time and were beginning to wither. The team inspected both the site where the sweet lime orchard had been removed and the groundnut field.



2a.Sweetlime orchard uprooted in the agricultural field



2b.Team visited agriculture field area at Karangaon

3.Characteristics of Karanjgaon:

- The village is situated on relatively flat terrain with slight undulations.
- It is located 22 km from the nearest town (Vaijapur) and 40 km from Sambhajinagar.
- The agricultural land consists of black soil and murrum (gravelly) soil.
- The village is connected by a small asphalt road and is situated in a remote area.
- Open stretches of barren land are clearly visible while approaching the village from the main road.
- Due to the summer heat, no standing crops were observed in the fields.
- Green trees were visible; while traveling along the road, I spoke with some locals who mentioned that obtaining drinking water is difficult during the summer season.

4.Agriculture:

- The village economy relies on agriculture. The soil types include both fertile black soil and gravelly (murmad) soil.
- Every year, crops are cultivated across 90% of the village's agricultural land during the Kharif season and 70% during the winter (Rabi) season.
- Traditional crops have been replaced by hybrid varieties. Recently, cotton and soybean have become the dominant crops. In contrast, about 40 years ago, many farmers cultivated sugarcane, although the total area under cultivation was smaller then.
- There is a distinct cropping pattern. For instance, soybean is currently cultivated on a large scale; prior to that, cotton was the primary crop. Cropping patterns tend to shift every 10 to 15 years. Recently, soybean cultivation has declined while maize cultivation has increased.
- Traditional farming methods have given way to practices relying on hybrid seeds and chemical fertilizers. Mechanization has also increased, leading to higher agricultural investment costs.
- Agriculture is the primary source of income. However, instead of farming collaboratively or in groups, farmers compete with one another. For example, there is a competitive race among farmers to see who uses the most chemical fertilizer. Another example is the tendency to follow the herd: if one farmer sows soybean, others do the same, often ignoring other crop options. This race to cultivate the same crop is driven by the need to secure an annual income.
- Cotton prices have dropped compared to a decade ago; consequently, farmers have shifted away from cotton cultivation in favor of soybean and maize.
- Many farmers had planted fruit crops like pomegranate, guava, and sweet lime (mosambi), but were forced to remove them due to a lack of water. Now that farm can be seen in open fields.



4a.Discussion with farmer in the Field



4b.Onion agriculturefield at Karanjgaon

5.Seeds and Chemical Fertilizers

- Farmers state that a harvest is obtained only if chemical fertilizers are applied; otherwise, crop yields decline, resulting in financial loss.
- There is no bank for indigenous (traditional) seeds.
- Hybrid seeds also lack quality; consequently, farmers are often forced to purchase substandard or 'bogus' seeds.

- 99 percent of farmers procure seeds—specifically hybrid varieties—from agricultural service centers (shops). While they do attempt to source varieties not readily available at these centers, indigenous seed varieties have become scarce in recent years.
- Due to a lack of awareness among farmers, the same chemical fertilizer—DAP—is applied to all crops. Recently, the usage of Urea has also increased. For instance, crops such as soybean, cotton, green gram (moong), black gram (urad), sorghum (jowar), and pearl millet (bajra) are primarily fertilized with DAP, with Urea applied as a supplementary dose.

6.Organic Farming:

There are two farmers in the village practicing organic farming; they have successfully cultivated a guava orchard using organic fertilizers for the past 10 years. They have never used chemical fertilizers for the guava crop, although they do use them for other crops due to the limited availability of organic fertilizer.

30% of the farmers use a combination of chemical and organic fertilizers on the same land. These farmers express a lack of faith in organic fertilizers.



6a.Groundnut field in the grown using both organic and chemical fertilizers

7.Produce Sales System:

- There is no stable market. While options like Vaijapur, Lasure, and Chhatrapati Sambhajinagar exist, rising transportation costs force farmers to sell their produce to local traders instead.
- Traders, rather than the farmers themselves, determine the selling price of the produce.
- Taking produce to the Agricultural Produce Market Committee (APMC) involves exploitation at various stages—such as issues with weighing scales, handling charges, weighing fees, grading, and receiving lower prices. Furthermore, payments are not made in cash; they are deposited into bank accounts after 15 days, and farmers lose another two days just to withdraw the money. Consequently, farmers are reluctant to sell their produce at the APMC.
- Farmers do not receive the Minimum Support Price (MSP) for their produce. They state that the agricultural records required by the government to fix the MSP are never properly maintained; instead, figures are often reported based on estimates.
- There is no fixed price for the produce of any crop.
- Many farmers wonder why they are unable to determine the price of their own produce. They acknowledge that prices are driven by supply and demand dynamics.
- There is a growing trend towards cultivating maize, but prices fluctuate significantly. For instance, maize fetched ₹2,200 per quintal in 2025, whereas in 2026, it sold for ₹1,700 per quintal. Consider another example: wheat that was priced at ₹3,800 per quintal during the monsoon season has now dropped to ₹2,200 per quintal at the time of harvest. Farmers face a recurring trend where the prices of their produce fall just as the harvest becomes ready for sale.

- Farmers are compelled to sell their produce immediately to cover various expenses, such as loan repayments, settling debts incurred on credit, children's school fees, and household costs. Farmers believe that the price decline is driven by the large number of farmers selling their produce simultaneously.

8.Agricultural Investment:

- Farmers reported that the investment required for one acre of cotton cultivation is approximately ₹30,000, with a return of ₹54,000. This figure does not account for the value of family labor. Approximately 80% of the farmers in the village are smallholders; consequently, the cost of agricultural investment is often beyond the means of individual families.
- There appears to be a lack of awareness among farmers regarding agricultural investment; investment costs are neither recorded nor tracked.

9.Pesticides:

- 99% of farmers spray both herbicides and pesticides.
- Farmers face a shortage of labor. Moreover, even when laborers are available, wage rates have risen to levels that farmers find unaffordable. As a result, farmers are inclined towards using herbicides.

10.Agricultural Assistants and Farming:

- Agricultural Assistants visit the village only once a month, and even then, only if they have specific work there. Farmers receive no guidance regarding farming practices.
- Even when farmers travel to the taluka headquarters to meet the Agricultural Officer, the officer is often unavailable to meet them.
- The Agriculture Department has not organized a single 'Agricultural School' (training program) in the village over the past decade.
- Information regarding government schemes is not communicated within the village.
- Many farmers remark, "If we were to farm based on the Agricultural Assistant's advice, we would end up having to sell off our farms. The truth is, the Agricultural Assistants themselves are the ones who need training. They lack the practical farming experience that farmers possess, as well as fundamental agricultural knowledge. Consequently, the general sentiment towards them is: 'We don't need your help; just stay out of our way.
- The PoCRA scheme was implemented in the village's agricultural area for five years; however, for the first two years, farmers were unaware of what the scheme actually entailed. The Agriculture Department failed to provide adequate information about PoCRA or specify which activities were to be undertaken under the scheme. As a result, the village could not derive significant benefit from it; farmers were only able to avail themselves of sprinkler and drip irrigation sets. Even in these instances, many farmers have not received the subsidy despite two years having passed.

11.Indebtedness:

- Farmers obtain crop loans from banks, credit societies, village cooperatives, private moneylenders, microfinance institutions, and shopkeepers.
- Interest rates are: 6–7% for banks (rising to 12% if repayment is delayed), 36–60% for private moneylenders, 12–16% for credit societies, 12–24% for microfinance institutions, and 30–50% for shopkeepers.
- Four farmers in the village have committed suicide due to indebtedness.

12.Water Availability:

- As the village lies in a rain-shadow region, rainfall is scarce. There was a need to augment surface and groundwater reserves, but this was not done; consequently, water scarcity begins as early as December.
- Rainwater is the only source of water available in the village's agricultural lands.
- Groundwater is extracted for crops using both open wells and borewells.
- There are at least 100 open wells and over 250 borewells in the village.
- The groundwater level lies at a depth of 400 to 500 feet.

13.Impacts of Climate Change:

- Agricultural production and income have declined due to the impact of climate change on farming.
- Accessing drinking water has become difficult; those who possess water sources have started trading it.
- The decline in economic status has led to a drop in the farmers' social standing.
- Women are experiencing adverse physical effects—such as frequent illnesses and skin problems—while also bearing the responsibility of farm work; mental stress is also on the rise.
- With climate change affecting agriculture, parents are concerned that the younger generation will not enter the farming profession.
- Resilience and physical endurance among people have diminished; for instance, the younger generation seeks shade as early as 10 AM.
- Climate change conditions favor the growth of *Parthenium* (carrot grass), leading to an increase in weed infestation.
- Rising temperatures are causing a decline in soil fertility.
- Rainfall patterns have become unpredictable; the monsoon season sees either dry spells or excessive rainfall, leaving farmers unsure about which crops to cultivate.
- Seasonal patterns have shifted; rains and heat do not occur on schedule, and the intensity of winter has decreased. Temperatures have risen. A temperature of up to 44 degrees Celsius has been recorded in the village.

14.What are the options?

- Group farming: A group should consist of a minimum of 10 and a maximum of 40 farmers.
- Generating higher income through organic farming with minimal investment.
- Cultivating crops that require less water and have a shorter growth cycle.
- Growing crops that can withstand hot and dry weather conditions.
- Developing market value chains for traditional agricultural produce.
- The government should provide a guaranteed price for agricultural produce.
- Ensuring the availability of water is essential.
- Providing training on organic farming to farmers.
- Creating awareness and providing materials for producing organic fertilizers.
- Establishing agro-processing industries.
- Setting up testing laboratories for seeds, fertilizers, and pesticides used in organic farming.

करंजगाव ता. वैजापूर, जिल्हा. छ. संभाजीनगर (FGD)

वैजापूर तालुका हा जायकवाडी प्रकल्पाच्या Back Water मधील येतो. तसेच पर्जन्यछायेचा आहे. येथे ५५० ते ६०० मिमी पाउस पडतो. तालुकायची शेती नदीकाठची असल्याबे काळी आणि गाळयुक्त आहे. पण खरीप आणि रब्बी या दोन हंगामासाठी पोषक आहे. तालुक्यातील किमान ६० टक्के परिसर हा कोरडवाहू आहे. त्यामुळे शेती, पाणी व्यवस्थापन, शेतमाल बाजार, अशा पायाभूत सुविधांपासून मागास आहे.

या तालुक्यातील करंजगाव या गावातील १२ शेतकऱ्यांच्या बरोबर आंब्याच्या झाडाखाली शेतात एक FGD करण्यात आली. या FGD साठी असर कडून विश्वजीत पुजारी, किशोर वीर, सोमिनाथ घोळवे तर CAG कडून अब्दुल हे उपस्थित होते. तर FGD मध्ये शेती, पाणी, शेतमाल बाजार, हवामान बदल, शेती निर्विष्ठांच्या वाढत्या किंमती, आधुनिक शेती, शेतीतील नवनवीन प्रयोग, पाणी उपलब्धता, शेतमजूर, भूमिहीन अशा अनेक मुद्द्यावर चर्चा केली. ही FGD करण्याचे ठिकाण एका आंब्याखाली असले तरीही शेजारीच मोसंबीची फळबाग उपटून टाकलेली होती, ते शेतकरी देखील FGD मध्ये सहभागी झाले. दुसरे, वैशिष्टे, शेजारी २ एकर क्षेत्रावर भुईमुग लागवड केलेली होती, मात्र या भुईमूगाला पाणी वेळेवर मिळाले नाही, त्यामुळे करपायला लागला होता. आपल्या टीमने शेतकऱ्यांनी मोसंबीची बाग काढलेली आणि भुईमुग असे दोन्हीची फेरी काढून पहाणी केली.

करंजगावाची वैशिष्टे :

- गाव सपाटीवर किंचित चढ – उतार असणारे आहे.
- शहरापासून (वैजापूर) २२ तर संभाजीनगर पासून ४० किमीदूर आहे.
- काळी आणि मुरमाड माती असलेली जमीन आहे.
- गावाला छोटीडांबरीकरण झालेला रस्ता असून remote परिसरातील गाव आहे.
- मुख्य रस्त्यावरून गावात जाताना उघडा माळरान सहज दिसून येते.
- उन्हामुळे एकही शेतात पीक उभे असल्यचे दिसून आले नाही.
- हिरवे वृक्ष दिसून येत होती,रस्त्याने जाताना काही लोक्शी बोलन झाले. त्यांनी शेतीची माहिती देताना सांगितले की उन्हाळा हंगामात पिण्याचे पाणी मिळणे कठीण असते.

शेती :

- गावाचे अर्थकारण शेतीवर आवलंबून आहे. शिवाय काळी आणि मुरमाड शेती आहे.
- गाव शिवारात एकूण ९० टक्के क्षेत्रावर खरीप, तर ७० टक्के क्षेत्रावर हिवाळी रब्बी पिकांची लागवड करण्यात येते.
- पारंपारिक पिके जाऊन संकरित वाण असलेली पिकांची लागवड केली जाते. अलीकडे कापूस आणि सोयाबीन ही दोन पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. तर पूर्वी (४० वर्षांपूर्वी) अनेक शेतकरी उसाची शेती करत होते, त्यावेळी लागवडीखाली क्षेत्र देखील कमी होते.
- एक पीक पॅटर्न आहे. उदा. सोयाबीन मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. १० वर्षापूर्वी कापसाची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जात आहे. प्रत्येकी १० ते १५ वर्षात पिकांचा पॅटर्न बदलतो. अलीकडे सोयाबीन कमी होऊन मका पीक वाढू लगले आहे.
- अलीकडे सेंद्रिय शेती जाऊन संकरित बियाणे आणि रासायनिक खते वापर करणारी शेती आली. शिवाय यांत्रिकीकरणाचा वापर देखील वाढला आहे. त्यामुळे शेतीतील गुंतवणूक देखील जास्त वाढली आहे.
- शेती हाच मुख्य उत्पादनाचा स्त्रोत आहे. त्यात एकत्र एकूण किंवा गट स्थापन करून शेतकऱ्यांनी शेती करण्याऐवजी स्पर्धेच्या आधारावर शेती केली जाते. उदा. रासायनिक खत कोण जास्त वापरतो ही स्पर्धा शेतकऱ्यांमध्ये लागलेली दिडून येते, दुसरे उदाहरण, एका शेतकऱ्यांने सोयाबीन पेरले, तर दुसरा शेतकरी देखील सोयाबीन पेरतो. इतर पिकांचा विचार केला जात नाही.
- १० वर्षापूर्वी जेवढा कापसाला जेवढा भाव होता, तेवढा भाव आता मिळत नाही म्हणून भाव कापसाची लागवड कमी होऊन मका पिकाच्या लागवडीकडे कल दिला आहे.

- अनेक शेतकऱ्यांनी डाळिंब, पेरू, मिसंबी असे फाल्पिकांची लागवड केली होती, मात्र पाण्याअभावी काढून टाकावी लागली.

बियाणे आणि रासायनिक खते

- शेतकरी सांगतात की, रासायनिक खत टाकले तरच पीक मिळतंय, नाहीतर पिकांमध्ये घसरण होते. त्याचा आर्थिक फटका बसतो.
- देशी बियाणे बँक नाही.
- संकरित बियाणे देखील दर्जेदार नाही. परिणामी बोगस बियाणेच शेतकऱ्यांना अनेकदा खरेदी करावं लागते.
- ९९ टक्के शेतकरी कृषी सेवा केंद्रातून बियाणे (दुकानातून संकरित बियाणे) आणले आणतात. जे बियाणे (वाण) कृषी सेवा केंद्रात मिळत नाही असे वाण मिळवले जाते. पण अलीकडील काही वर्षात देशी बियाणे वाण दुर्मिळ झाले आहेत.
- शेतकऱ्यांमध्ये अज्ञान असल्याने, सर्वच पिकांना एकच रासायनिक खत दिले जाते. ते म्हणजे डीएपी होय. अलीकडे युरिया वापराचे प्रमाण देखील वाढले आहे. उदा. सोयाबीन, कापूस, मुग, उडीद, ज्वारी, बाजरी या सराव पिकांना डीएपी हेच खात दिले जाते, तर डोस म्हणून युरिया दिला जातो.
-

सेंद्रिय शेती

- गावात दोन शेतकरी सेंद्रिय शेती करणारे आहेत, ते गेल्या १० वर्षांपासून सेंद्रिय खतांचा वापर करून पेरूची बाग फुलवली आहे. त्यांनी एकदाही रासायनिक खत पेरूच्या शेतीला वापरले नाही.
- ३० टक्के शेतकरी एकाच शेतात रासायनिक आणि सेंद्रिय खते वापरतात. सेंद्रिय खतांवर विश्वास नाही असे शेतकरी सांगतात.

शेतमाल विक्री व्यावस्था :

- शाश्वत बाजारपेठ नाही. वैजापूर, लासुरे आणि छ. संभाजीनगर असे तीन पर्याय आहेत. पण वाहतुकीचा खर्च वाढत असल्याने गावातील व्यापाऱ्यांनाच शेतमाल विकावा लागतो.
- शेतकऱ्यांनी शेतमालाचे भाव ठरवण्याऐवजी व्यापारी ठरवतो.
- कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतमाला विक्रीसाठी नेला तर वजन काटा, हमाली, तोलाई, ग्रेडिंग, भाव कमी देणे अशा विविध पातळ्यांवर लूट होते. शिवाय पैसे हातावर येण्याऐवजी बँकांमध्ये १५ दिवसांनतर जमा होतात, ते काढायला देखील दोन दिवस शेतकऱ्यांचे जातात, त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी शेतकरी उत्साही नाहीत.
- शेतमाला MSP (हमीभाव) मिळत नाही. मुळात हमीभाव निश्चित करण्यासाठी ज्या शेतीच्या नोंदी कराव्या लागतात, त्या कधीच ठेवल्या जात नाहीत, सर्वं अंदाजे दाखवले जाते असे शेतकरी सांगतात.
- कोणत्याही पिकांच्या शेतमालाला भाव निश्चित नाही.
- शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील शेतमालाचा भाव ठरवता का येत नाही, असा प्रश्न अनेक शेतकऱ्यांना पडलेला आहे. सार्वजन मागणी आणि सप्लाय यावर भाव आधरित असतात, असे म्हणतात.
- मका पिकाचे उत्पादन घेण्याकडे कल वाढला आहे. पण भावात मोठी चढ उतार दिसून येतो. उदा. २०२५ साली मका २२०० रुपये क्विंटल भाव मिळाला होता, तोच २०२६ मध्ये १७०० रुपये प्रती क्विंटल मिळाला. दुसरे उदाहरण. गहूला पावसाळ्यात ३८०० रुपये प्रती क्विंटल होता, तोच गहू काढणीला असा आता २२०० रुपये क्विंटल झाला. अशी शेतकऱ्यांकडे शेतमाल विक्रीसाठी आला असता, शेत्मालच्या भावांमध्ये घसरण होणे प्रत्येक वर्षी चालू आहे.
- कर्ज फेड करणे, उदारी देणे, मुलांच्या शाळेचा खर्च, कुटुंबाचा खर्च अशा विविध खर्चासाठी शेतीतून निघालेला शेतमाल शेतकऱ्यांना तत्काळ विकावा लागतो. शेतमाल विकणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जास्त असल्याने, भावामध्ये घसरण होते असे शेतकऱ्यांचे मत आहे.

शेतीतील गुंतवणूक :

- एक एकर कापसाच्या शेतीतील गुंतवणूक अंदाजे ३० हजार रुपये आणि परतावा हा ५४ हजार रुपये असल्याचे शेतकरी सांगत होते. यात घरातील मजुरांची मजुरी पकडलेली नाही.
- शेतीतील गुंतवणुकीच्या बाबतीत शेतकऱ्यांमध्ये जागृती असल्याचे दिसून येत नाही. गुंतवणुकीचा खर्च लिहून ठेवला जात नाही की हिशोब ठेवला जात नाही.

कीटकनाशके

- ९९ % शेतकरी तननाशके आणि कीटकनाशके असे दोन्हीची फवारणी करतात.
- मजूर मिळत नाही. शिवाय मिळाले तरीही त्यांची मजुरी ही शेतकऱ्यांना परवडेल अशी नाही.

कृषी सहय्यक आणि शेती :

- गावात कृषी सहाय्यक १ महिन्यातून एकदा येतात. तेही त्यांचे गावात क्जाही काम असेल तर. शेतकऱ्यांना शेतीचे मार्गदर्शन केल जात नाही.
- तालुक्याच्या ठिकाणी कृषी अधिकारी यांना भेटायला शेतकरी गेले तर भेट देत नाहीत.
- कृषी शाळा घेतल्या जात नाहीत.
- योजनांची माहिती गावात येऊन दिली जात नाही.
- अनेक शेतकरी सांगतात की, “कृषी सहाय्यक यांच्या सल्याने शेती केली तर शेती विकण्याची वेळ येईल. कारण प्रथम कृषी सहाय्यक यांनाच शेतीच्या प्रशिक्षणाची गरज आहे. शेतकऱ्यांना शेतीचा जसा अनुभव आहे, तसे कृषी सहाय्यक यांना नाही. शिवाय शेतीचे ज्ञान देखील नाही. त्यामुळे भिक नको पण कृत्रे आवरा अशी अवस्था कृषी सहाय्यक यांची आहे.”.
- पोकरा योजना ५ वर्ष गावाच्या शिवारात राबवली, मात्र पहिले दोन वर्ष नेमकी पोकरा योजना काय आहे हेच शेतकऱ्यांना माहित नाही, कृषी विभागाने पोकरा विषयी फारशी माहिती दिली नाही की योजनेतून कोणकोणती कामे करावयाची आहेत हेच सांगितले नाही, परिणामी गावाला पोकरा योजनेचा फारसा लाभ घेता आला नाही, शेतकऱ्यांना केवळ तुषार सिंचन सेट आणि ठिबक सिंचन या दोन्हीचा लाभ घेता आला. त्यामध्ये देखी अनेक शेतकऱ्यांना दोन वर्ष झाली तरीही अनुदान मिळालेलं नाही.

कर्जबाजारीपणा :

- बँक, पतसंस्था, गाव सोसायटी, खासगी सावकार, मायक्रो फायनान्स, दुकानदार यांच्याकडून शेतकरी पीक कर्ज घेतात.
- बँक ६ ते ७ टक्के (वेळेवर परतफेड केली नाहीतर १२ टक्के), खासगी सावकार ३६ ते ६० टक्के, पतसंस्था १२ ते १६ टक्के, मायक्रो फायनन्स १२ ते २४ टक्के, दुकानदार ३० ते ५० टक्के व्याजदर आहेत.
- कर्जबाजारीपणातून गावात ४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

पाणी उपलब्धता :

- गाव पर्जन्य छायेच्या परिसरात येत असल्याने पाउस कमी पडतो. जमिनीवरील आणि भूगर्भातील पाणीसाठे वाढवणे गरजेचे होते, ते वाढवले नाहीत. परिणामी डिसेंबर महिन्यापासून पाणीटंचाईला सुरुवात होते.
- गाव शिवारात केवळ पावसाचे पाणी उपलब्ध आहे.

- भूगर्भातील पाणीसाठे विहिरीद्वारे आणि बोअरवेल या दोन्हीच्या माध्यमातून पिकांसाठी उपसले जाते.
- गावात किमान १०० पेक्षा जास्त विहिरी आहेत. तर २५० पेक्षा जास्त बोअरवेल आहे
- ४०० ते ५०० फुट खोल पाणी पातळी भूगर्भात आहे.
-

हवामान बद्दलचे परिणाम :

- शेतीवर हवामान बद्दलचे परिणाम झाल्याने उत्पादन आणि उत्पन्न घसरले आहे.
- पिण्याचे पाणी मिळणे कठीण झाले, ज्याच्याकडे पाणी आहे, ते त्याचा व्यापार करू लागले आहेत.
- आर्थिक परिस्थितीत घसरण झाल्याने , शेतकऱ्यांची सामाजिक दर्जा देखील घसरला आहे.
- महिलांच्या शरीरावर जास्त परिणाम होणे सुरु झाले. उदा. सतत आजारी पडणे, त्वचा समस्या निर्माण होणे, शेतीतील कामाची जबाबदारी महिलांना घ्यावी लागतेय. मानसिक तणाव वाढू लागला आहे.
- हवामान बदलचा परिणाम शेतीवर होऊ लागल्याने, नवीन पिढी शेतीत येणार नाही अशा काळजी पालक घेऊ लागले आहेत.
- माणसांमधील दमदारपणा, सहनशीलता कमी झालीय. उदा. सकाळी १० वाजताच सावलीला जाऊन नवीन पिढी बसते.
- हवामान बदलाच परिणाम गाजर गवतासाठी पूरक आहे. तणाचे प्रमाण वाढले आहे.
- तापमान वाढल्याने मातीतील सुपीकपणा कमी होऊ लागला आहे.
- पाऊस पाडण्यात अनिश्चिता आली आहे. पावसाळ्यात कधी खंड पडतो तर कधी अतिवृष्टी होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी नेमकी कोणत्या पिकांची लागवड करायची हा प्रश्न उभा राहिलेला आहे.
- पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा या ऋतूमधील बदल झालेला आहे, वेळेवर पाउस पडत नाही की उन्ह देखील पडत नाही. थंडी देखील कमी झाली आहे. तापमान वाढले आहे. गावात ४४ डिग्री सेन्सिअस पर्यंत नोंद झाली आहे.
-

पर्याय काय?

- गट शेती शेती. कमीत कमी १० आणि जास्तीत जास्त ४० शेतकरी या गटात असायला हवे.
- सेंद्रिय शेती करून कमी गुंतवणुकीतून जास्त उत्पन्न मिळवणे.
- कमी पाण्यावर आणि कमी कालावधीत येणारी पिके घेणे.
- उष्ण आणि कोरड्या हवामानात तग धरून राहणाऱ्या पिकांची लागवड करणे.
- पारंपारिक पिकांच्या शेतमालासाठी मार्केटची मूल्य साखळी विकसित करणे.
- हमीभाव सरकारने शेत मालाला देयला हवा.
- पाणी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.
- शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे प्रशिक्षण देणे
- सेंद्रिय शेतीला खते बनवण्याचे साहित्य आणि जागृती करायला हवी.
- शेतमाल प्रक्रिया उद्योग देखील करायला हवा.
- सेन्द्रीय शेतीसाठी लागणारे बियाणे, खते आणि कीटकनाशके यांची टेस्टिंग lab असणे गरजेचे आहे.
-